| | | |
|---|---|---|
| MHST090009402024 | दाखल दिनांक | २९/०७/२०२४ |
| | नोंदणी दिनांक | २९/०७/२०२४ |
| | निकाल दिनांक | २०/०६/२०२६ |
| | कालावधी | वर्ष महिने दिवस<br>०१ १० २२ |

**भाग अ**

**कोरेगाव येथील न्यायदंडाधिकारी वर्ग –१,यांचे न्यायालयात,ता. कोरेगाव,जि. सातारा.**

(पिठासिन अधिकारी पी.डी.यवतकर)

**नियमीत फौजदारी खटला क्र.२४७/२०२४** **निशाणी क्र.१४**

| | | |
|---|---|---|
| **प्रथम खबर अहवालचा तपशिल:** | **अपराध क्र.:** | १४७/२०२४ |
| | **पोलीस स्टेशन:** | रहिमतपुर पोलीस ठाणे |

| | |
|---|---|
| फिर्यादी | **महाराष्ट्र शासन,**<br>रहिमतपूर पोलीस स्टेशन<br>ता.कोरेगाव, जि.सातारा. |
| प्रतिनिधीत्व | सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन.एन.पवार. |
| आरोपी | **आशिष तुकाराम चव्हाण**<br>वय – ३१ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>रा. कोंबडवाडी, पो.आर्वी, ता.कोरेगाव, जि.सातारा. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | ॲड.एस.एस.साखरे |

**भाग ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची दिनांक | १५/०६/२०२४ |
| फिर्याद दाखल दिनांक | १५/०६/२०२४ |

| | |
|---|---|
| दोषारोप दाखल दिनांक | २९/०७/२०२४ |
| दोषरोप ठेवल्याचा दिनांक | ०७/०८/२०२४ |
| प्रकरणात पुरावा सुरु झाल्याची दिनांक | १७/०८/२०२४ |
| प्रकरण न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची दिनांक | २०/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय घोषित दिनांक | २०/०६/२०२६ |
| शिक्षा सुनविल्याचा आदेशाची दिनांक जर असेल तर | -- |

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आशिष तुकाराम चव्हाण | --- | ०७.०८.२०२४ | महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) | निर्दोष | निरंक | निरंक |

## भाग क

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नि.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|---|
| १. | ८ | बाळू आनंदराव निकम | पंच |
| २. | ११ | तुषार सुनिल काळंगे | फिर्यादी |

### ब. आरोपीतर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

अभियोग पक्ष/ आरोपी/ न्यायालयीन पुराव्यांची यादी

अ. अभियोग पक्षाचा पुरावा

| निशाणी क्र. | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|
| ९ | पंचनामा सहीपूर्ती |
| १२ | फिर्याद |

ब. आरोपीतर्फे पुरावा

| निशाणी क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क. न्यायालयीन पुरावा

| निशाणी क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(घोषित केल्याचा दिनांक – २० जुन, २०२६)

प्रस्तुत खटला आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) नुसार चालवण्यात आला.

अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –

२) दिनांक १५/०६/२०२४ रोजी १४.२० वा.चे सुमारास कोंबडवाडी पो.आर्वी, ता.कोरेगाव, जि.सातारा गावचे हद्दीतीत आरोपीने त्याचे स्वतःचे आर्थिक फायदयासाठी बेकायदा बिगरपरवाना देशी दारु पहिलीधार संत्राच्या १८० मिली च्या १२ सिलबंद बाटल्या एकुण किंमत रु. ८४०/– चा प्रोव्हीचा माल बाळगले स्थितीत मिळून आला म्हणून फिर्याद दाखल केली आहे.

३) या तक्रारीवरून रहिमतपूर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१४७/२०२४ नोंदवण्यात येवुन त्याचा पुढील तपास पो.हवा एस.जे.घाडगे यांना देण्यात आला. तपासात त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले, घटनास्थळ पंचनामा केला, जप्ती पंचनामा केला. तपासामध्ये गुन्हा घडल्याचे निष्पन्न होत असल्यामुळे त्यांनी आरोपीविरुध्द दोषारोप पत्र न्यायालयात हजर केले.

४) दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आल्यानंतर आरोपी हजर झाल्यावर त्याला त्याच्यावर ठेवण्यात आलेला दोषारोप (नि.क्र.६) वाचून दाखवण्यात आला. त्याने दोषारोपपत्रामध्ये गुन्हा कबूल नाही असे सांगून अभियोगाची मागणी केली.

५) अभियोगतर्फे सरकारी वकील श्रीमती एन.एन.पवार व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.साखरे यांचा युक्तिवाद ऐकला. सदर खटल्यातील पुरावा व युक्तिवाद पाहता, माझे समोर खालील मुद्दे उपस्थित झाले असून त्याचे निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, दिनांक १६/०६/२०२४ रोजी १४.२० वा.चे सुमारास कोंबडवाडी पो.आर्वी,ता.कोरेगाव, जि.सातारा गावचे हद्दीतीत आरोपीने त्याचे स्वतःचे आर्थिक फायदयासाठी बेकायदा बिगरपरवाना देशी दारु पहिलीधार संत्राच्या १८० मिली च्या १२ सिलबंद बाटल्या एकुण किंमत रु.८४०/– चा प्रोव्हीचा माल बाळगले स्थितीत मिळून आला म्हणून आरोपीने महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे भंग केला ? | ... | नाही. |
| २) | काय आदेश ? | ... | आरोपीस निर्दोष मुक्त करणेत येत आहे. |

## कारणमिमांसा

६) आरोपी विरूध्द उपरोक्त गुन्हा सिध्द करणेसाठी अभियोग पक्षातर्फे पंच साक्षीदार क्र.१ बाळू आनंदराव निकम यांची साक्ष नि.क्र.८ वर, पोलीस कर्मचारी फिर्यादी सा.क्र.२ तुषार सुनिल काळंगे यांची साक्ष नि.क्र.११ वर नोंदविण्यात आलेली आहे. पुराव्याअंती आरोपी विरुध्द फौ.प्र.संहिता कलम ३१३ अन्वये नि.क्र.१३ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आला आहे.

**मुद्दे क्रमांक १ व २ करीता:–**

७) आरोपी विरूध्द उपरोक्त गुन्हा सिध्द होणेसाठी त्याने संबंधित वेळी व ठिकाणी देशी विदेशी दारू बेकायदेशीररित्या बाळगल्याचे निःसंशयपणे सिध्द होणे अत्यंत आवश्यक

आहे. त्यादृष्टीने अभिलेखावर आलेल्या पुराव्याबाबत आता विचार करू. अभियोग पक्षातर्फे पोलीस कर्मचारी फिर्यादी तुषार अनिल काळंगे (सा.क्र.२) यांचे पुराव्यातून असे दिसते की, ते १५/०६/२०२४ रोजी रहिमतपूर पोलीस स्टेशन येथे कार्यरत असताना त्यांना मिळालेल्या माहितीप्रमाणे ते, इतर पोलीस कर्मचारी व दोन पंच असे सर्वजण मौजे कोंबडवाडी पो.आर्वी गावच्या हद्दीत छापा टाकला असता, त्याठिकाणी आरोपीच्या ताब्यात पहिली धार संत्राच्या देशी दारु १८० मि.ली च्या १२ बाटल्या मिळून आल्या व तो मुद्देमाल दोन पंचांच्या समक्ष जप्त केल्या, आरोपीकडे देशी दारु विक्रीचा परवाना नव्हता व त्यानंतर आरोपी विरुध्द फिर्याद दाखल केली. सदर साक्षीदाराने त्याचे उलटतपासामध्ये आरोपीच्या वकीलांनी विचारलेल्या उत्तर सूचक प्रश्नांची उत्तरे नाकारलेली आहेत. सदर साक्षीदाराने उलटतपासामध्ये मुद्देमालाचा बॅंक क्रमांक, तारीख व कंपनीचे नाव फिर्याद मध्ये नमूद नाही त्याचप्रमाणे पंचनाम्यात देखील नमूद नाही हे मान्य केले आहे. सदर साक्षीदाराने उलटतपासामध्ये विचारलेल्या इतर सर्व सूचक प्रश्नांची उत्तरे नाकारलेली आहेत.

८) अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले सा.क्र.१ बाळू आनंदराव निकम हे घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार असुन पोलीसांनी त्यांना पंचनाम्यासाठी कोठेही बोलावले नव्हते, पंचनामा त्यांच्या समक्ष झाला नाही, पोलीसांनी एका कागदावर सही घेतली असे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे सदर प्रकरणात जप्ती पंचनामा शाबीत होत नसल्यामुळे, आरोपीच्या ताब्यातून मुद्देमालाची जप्ती शाबीत झालेली नाही.

९) सदर प्रकरणामध्ये आरोपी हा देशी दारु बाळगतांना मिळुन आला असा त्याचेवर आरोप ठेवण्यात आलेला आहे. आरोपी विरूध्द आरोप सिध्द करण्यासाठी आरोपीच्या ताब्यात जप्त करण्यात आलेला मुददेमाल ही दारूच होती असे रासायनिक तज्ञांचा अहवालावरून सिध्द करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल करण्यात आलेला आहे, परंतु सदरील अहवाल सिध्द न झाल्यामुळे जप्त केलेला मुददेमाल ही देशी दारुच आहे हे सिध्द होत नाही. सदर प्रकरणात घटनास्थळ व जप्ती पंचनामा शाबीत झालेला नाही. अशा परिस्थीतीमध्ये अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे मिळून आलेला मुद्देमाल ही देशी दारुच होती असे दिसत नाही. म्हणून सरकार पक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा निःसंशयपणे सिध्द केला, असे म्हणता येणार नाही. म्हणून मी **मुद्दा क्र. १** चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

१०) यापुर्वीच उल्लेख केल्याप्रमाणे सरकारी पक्षातर्फे देण्यात आलेला साक्षीपुरावा आरोपीने गुन्हा केला आहे, असे सिध्द करीत नाही. आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणात जप्त केलेल्या मुद्देमालाबाबत आदेश खालीलप्रमाणे केला आहे. करीता मुद्दा क्रमांक २ चे उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) आरोपी **आशिष तुकाराम चव्हाण** यास महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) खालील आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपीचा जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३) प्रकरणातील जप्त केलेला मुद्देमाल अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन्न शुल्क सातारा यांच्याकडे नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरीता पाठविण्यात यावा.

४) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) प्रमाणे रूपये १५,०००/- चा जामीन द्यावा.

PUSHPLATA DHONDIRAJ YAVATKAR
Digitally signed by PUSHPLATA DHONDIRAJ YAVATKAR
Date: 2026.06.20 17:33:11 +0530

कोरेगाव
ता. २०/०६/२०२६

(पी.डी.यवतकर)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगाव
ता.कोरेगाव, जि.सातारा.